

# डुग्गूचा फराळ




रेश्मा बर्वे


सकाळ प्रकाशन

# डुग्गूचा फराळ



लेखन व चित्रे- रेश्मा बर्वे






किनाऱ्यावर खूप होड्या होत्या.
एक..दोन.. तीन..चार...कित्तीतरी..!
डुग्गू आश्चर्यानी बघतच राहिला.


मग एका छानशा होडीत बसून डुग्गू समुद्रात निघाला. वर.. खाली.. वर.. खाली.. लाटा उसळत होत्या. खूप वेळ प्रवास झाला.

किनारा जवळ आला, तसा डुग्गूला गोड गोड वास यायला लागला.







होडी किनाऱ्याला लागताच डुग्गूनी बाहेर उडी मारली. समोर भलेमोठे डोंगर होते. हेऽऽ उंचच उंच! डुग्गूनी विचार केला, 'जाऊया चढून'.









डोंगर चढता चढता डुग्गू बिचारा इतका दमला...
वर आल्यावर पाहतो तो काय? सगळीकडे जाड जाड हूक
बसवले होते आणि त्यांना दोरे बांधून ठेवले होते.









डुग्गूनी वर पाहिलं.
''अरे, इथे इतके पतंग कुणी
बांधून ठेवलेत?''





तो एका पतंगाची दोरी सोडायला गेला,
तेवढ्यात कुठूनसं एक काटेरी चक्र सरसरत
तिथे आलं. त्यानी पतंगांचे दोरे कापले.



पतंग
उडाले
आकाशात
आणि
चक्र
आलं
डुग्गूच्या
अंगावर...

गर्ऽऽगर्ऽऽ
सूंईऽऽ सूंईऽऽऽऽ
हाऽय हाऽऽय....




“आईऽऽ
चकली
तिखट
लागत्ये...”



डुग्गू राहतो इथेच, तुमच्या आमच्यातच.
पण एखादद्या कल्पनेच्या मागे निघाला,
की कुठच्या कुठे जाऊन पोहोचतो...
त्याच्या या मजेदार कल्पनांच्या राज्यात
फिरवून आणणाऱ्या या 'डुग्गूच्या गोष्टी'






© रेशमा बर्वे, पुणे (२०११)
३२,मंगलवाडी, से. बा. मार्ग, पुणे ४११०१६
barvereshma@gmail.com

प्रकाशक:
सकाळ पेपर्स लि.
५९५, बुधवार पेठ, पुणे २.
संपर्क : ८८८८८ ४९०५० /
०२०-२४४०५६७८.

सकाळ प्रकाशन
ISBN 978-93-80571-89-8
9 789380 571898 >
₹ ४०/-